सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
**पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य**
**महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१**

क्र. पोमसं /३६/ र.व का.(८३००) शा.नि.-अधिसूचना /०७/२०२५, मुंबई, दिनांक ई-स्वाक्षरीत नमुद

**संदर्भ** :- महाराष्ट्र शासन, गृह विभाग, निर्णय क्रमांक-पोलीस -११२१ / प्र. क्र. २६१/ पोल-५अ, दि.०५/०८/२०२५.

**विषय** :- महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक यांच्या आस्थापनेवर पोलीस उपनिरिक्षकांची ६२५ अधिसंख्य पदे निर्माण करणेबाबत.

*****

महाराष्ट्र शासन, गृह विभाग, क्रमांक-पोलीस -११२१ / प्र. क्र. २६१/ पोल-५ अ, दि.०५/०८/२०२५ ची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०२५०८०५१४५३४२७१२९ असा आहे.

२. तरी, सदर शासन निर्णयानुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

Signed by
Pravin Madhukar Shikhare
Date: 11-08-2025 22:16:29
( प्रविण शिखरे )
पोलीस महासंचालक यांचे उपसहायक (र.व का.),
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता.

प्रति,
अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
अपर पोलीस महासंचालक, (आस्थापना) /(प्रशासन), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
विशेष पोलीस महानिरीक्षक (आस्थापना/ प्रशिक्षण व खास पथके), महाराष्ट्र राज्य, मुंबई
संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक.
पोलीस महासंचालक यांचे उप सहायक (आस्था-2) .
कार्यासन अधिकारी, का क्र.५

प्रत :-
पोलीस उप अधिक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

2. पोलीस उप अधिक्षक, यांना विनंती करण्यात येते की, सदरहू शासन निर्णयाची प्रत या कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर शासन निर्णय / परिपत्रके “आस्थापना" या सदराखाली प्रकाशित करण्यात यावा.

**महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक यांच्या आस्थापनेवर पोलीस उपनिरीक्षकांची ६२५ अधिसंख्य पदे निर्माण करणेबाबत..**

**महाराष्ट्र शासन**
**गृह विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : पोलीस- ११२१/प्र.क.२६१/पोल-५अ**
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक :- ०५ ऑगस्ट २०२५

**वाचा :-**

१) अपर पोलीस महासंचालक (आस्थापना) पोलीस महासंचालक कार्यालय,मुंबई यांचे पत्र क्र. पोमसं/५/१०/ससे/ पोउपनि (मुख्य) परीक्षा -२०२२/३९/२०२४, दि.१७.०७.२०२५
२) वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक-पदनि-२०१६/प्र.क्र.७/१६/वित्तीय सुधारणा-१, दि.२०.०२.२०१६

**प्रस्तावना:-**

महाराष्ट्र दुय्यम सेवा अराजपत्रित, गट-ब (मुख्य) परीक्षा- २०२२ मधील, २०२१ व २०२२ च्या परीक्षेच्या प्रतिक्षा यादीमधील, मागील सत्रामधील मुदतवाढ दिलेले,चारित्र्य पडताळणी संदर्भात अमुस (गृह) यांच्या अध्यक्षतेखालील समितीने पात्र ठरविलेले व दि.०५.०५.२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये पोलीस उपनिरीक्षक पदावर नियुक्ती दिलेले अशा एकूण ६२५ उमेदवारांचे पोलीस उपनिरीक्षक पदाचे १२ महिन्यांचे मुलभूत प्रशिक्षण महाराष्ट्र पोलीस अकॅडमी, नाशिक येथे प्रशिक्षण सत्र क्र.१२७ मध्ये दि.०९.०६.२०२५ पासून सुरु करण्यात आले आहे. सदर प्रशिक्षाणार्थी पोलीस उपनिरीक्षकांचे वेतन व भत्ते अदा करण्याकरीता महाराष्ट्र पोलीस अकॅडमी, नाशिक यांच्या आस्थापनेवर पोलीस उपनिरीक्षकांची ६२५ अधिसंख्य पदे निर्माण करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

महाराष्ट्र दुय्यम सेवा अराजपत्रित, गट-ब (मुख्य) परीक्षा- २०२२ मधील, २०२१ व २०२२ च्या परीक्षेच्या प्रतिक्षा यादीमधील, मागील सत्रामधील मुदतवाढ दिलेले,चारित्र्य पडताळणी संदर्भात अमुस (गृह) यांच्या अध्यक्षतेखालील समितीने पात्र ठरविलेले व दि.०५.०५.२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये पोलीस उपनिरीक्षक पदावर नियुक्ती दिलेले अशा एकूण ६२५ प्रशिक्षणार्थी पोलीस उपनिरीक्षकांचे वेतन व भत्ते अदा करण्यासाठी **महाराष्ट्र पोलीस अकॅडमी, नाशिक यांच्या आस्थापनेवर दि.०९.०६.२०२५ ते दि.०९.०६.२०२६ या कालावधीसाठी पोलीस उपनिरीक्षकांची ६२५ अधिसंख्य पदे निर्माण करण्यास मान्यता देण्यात येत आहे.**

२. सदर अधिसंख्य पदे विविध पोलीस घटकांमध्ये पोलीस उपनिरीक्षकांच्या रिक्त असलेल्या

पदांच्या अधिनतेने निर्माण करण्यात आली असल्याने सदर पोलीस उप निरीक्षकांची रिक्त पदे ज्या आस्थापनेवर आहेत त्या आस्थापनेवर वेतन काढले जाणार नाही याची खात्री करण्यात यावी.

३. याकरीता होणारा खर्च वित्तीय वर्ष सन २०२५-२६ व सन २०२६-२७ साठी " मागणी क्र. बी-१, २०५५ पोलीस, १०९ जिल्हा पोलीस दल, (००) (०१) जिल्हा पोलीस बल" या लेखाशिर्षाखाली संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक यांना मंजूर असलेल्या अनुदानातून भागविण्यात यावा.

४. सदर शासन निर्णय संदर्भ क्र.२ येथील वित्त विभाग,शासन निर्णय क्रमांक.पदनि-२०१६/प्र.क्र.७/१६/वित्तीय सुधारणा-१, दिनांक २०.०२.२०१६ अन्वये प्रशासकीय विभागांना प्रदान करण्यात आलेल्या प्राधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२५०८०५१४५३४२७१२९ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

GAIKWAD GANESH SUDAM

Digitally signed by GAIKWAD GANESH SUDAM
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HOME DEPARTMENT, 2.5.4.20=F88A2DF366DBF702EDA9179BFDD100F151490E691798947C7F6D1B8CF0DAB7D6, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=0585EFA444AE7B29EC4D54E290F9F826C6E4DE96799148FCFC4C6E13F203B34E, cn=GAIKWAD GANESH SUDAM
Date: 2025.08.05 18:13:28 +05'30'

**( गणेश गायकवाड )**
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२. पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
३. अपर पोलीस महासंचालक (आस्थापना/प्रशासन), पोलीस महासंचालक कार्यालय, मुंबई
४. विशेष पोलीस महानिरीक्षक (आस्थापना), पोलीस महासंचालक कार्यालय,मुंबई
५. संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक.
६. महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा) महाराष्ट्र -१, मुंबई
७. अधिदान व लेखाधिकारी, मुंबई
८. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
९. जिल्हा कोषागार अधिकारी, नाशिक
१०. निवडनस्ती (पोल-५अ)